# प्रकरण चौथे

## भाऊ पाध्ये यांच्या कथालेखनाचे विशेष

## प्रकरण चौथे

## भाऊ पाध्ये यांच्या कथालेखनाचे विशेष

### प्रास्ताविक:

स्वतःची निश्चित वाङ्मयीन भूमिका असणारे लेखक कोणताही वाङ्मय प्रकार गंभीरपणे हाताळत असतात. त्यांचे लेखन हे त्यांच्या भूमिकेशी प्रामाणिक असते. गंभीरपणे लेखन करणे हे व्रतस्थपणाचे काम आहे. त्यासाठी लागणारी गंभीर वैचारिक बैठक ज्या लेखकांच्या जवळ असते असे लेखकच आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहून लेखन करु शकतात.

आपल्या वाङ्मयीन भूमिकेशी प्रामाणिक राहून लेखन करणारा अल्पसंख्य लेखकांचा वर्ग आपल्या साहित्यक्षेत्रात आहे. यामध्ये भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, दि.पु. चित्रे, अरुण कोल्हटकर, अनंत कदम, रंगनाथ पठारे इत्यादी लेखकांचा समावेश करता येईल. या लेखकांनी लेखन ही गंभीर प्रक्रिया मानून कलाकृती निर्माण केलेल्या आहेत. या भूमिकेशी प्रामाणिक रहाण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला प्राप्त झालेली वाङ्मयीन प्रतिष्ठा अन्य लेखकांच्या लेखनापेक्षा अधिक आहे.

फक्त कथेच्या बाबतीत विचार करावयाचा झाला तर गंगाधर गाडगीळ, कमल देसाई, भाऊ पाध्ये यांनी भूमिकानिष्ठ लेखन केलेले आहे. या लेखकांच्या कथा ह्या त्यांच्या वाङ्मयीन भूमिकेशी सुसंगत स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे या लेखकांच्या कथा अधिक वैशिष्ठ्यपूर्ण व या लेखकांच्या "लेखक" म्हणून असणाऱ्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू दर्शविणाऱ्या आहेत.

संख्यात्मकदृष्टया या लेखकाचे लेखन विपुल नसले तरी गुणात्मदृष्टया संपन्न व अधिक कलात्मक आहे. याला कारण या लेखकांनी लेखन हे जाणीवपूर्वक, परिश्रमपूर्वक करावयाचे निर्मितीचे अंग मानलेले आहे. व त्यानुसारच त्यांनी लेखन केलेले आहे.

या प्रकरणामध्ये आपल्याला भाऊ पाध्ये यांच्या कथा लेखनाच्या वैशिष्टयांचा विचार करावयाचा आहे.

व्यापक सहानुभाव असणारे मानवतावादी लेखन:

भाऊ पाध्ये हे व्यापक सहानुभाव असणारे मानवतावादी लेखक आहेत. असे आपण आधीच्या विवेचनातही ध्यानात घेतले आहे. त्यांच्या लेखनातून सर्वसामान्य माणसाविषयीचा कळवळा, त्यांच्या जगण्याविषयीची कमालीची आस्था प्रत्ययाला येते. माणसाच्या अकृत्रिम नैसर्गिक जगण्याला पाध्ये अधिक महत्त्वाचे मानतात. माणसाच्या अंत:करणातील चांगलेपणा त्यांना महत्त्वाचा वाटतो. माणसानं कसं असावं, कसं जगावं याचा अकृत्रिम आविष्कार पाध्ये आपल्या कथांतून करतात. ते आपल्या कथांतून माणसाच्या मूलभूत वर्तनाची चाहूल घेण्याचा प्रयत्न करतात.

संवेदनाशून्य कृत्रिम जगणे, कमालीच्या आत्मकेंद्रीपणामुळे नैसर्गिक जगणे टाळणे या सगळ्याची अयथार्थता त्यांच्या कथांतून प्रतीत होते. त्यांना जगण्यातील सच्चेपणा महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे मुंबईतील सामान्य माणसापासून ते राजकारणी, कलावन्त गुंड, उच्चवर्गीय यांना ते आपल्या कथेचा विषय बनवितात. या सा-यांचे जीवन व्यापक सहानुभावाने ते आपल्या कथेत रंगवतात. हा मानवतावादी व्यापक सहानुभाव पाध्ये यांच्या पूर्वीच्या कथेत आल्याची उदाहरणे अपवादात्मक

दाखवता येणे ही कठीणच. त्यामुळे पाध्यांच्या लेखनाचे हे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणावे लागते.

महानगरी मुंबई आणि मुंबईत वावरणारा माणूस हे त्यांच्या कथेचे प्रमुख आधार आहेत. तेथील वातावरणातच त्यांच्या कथा घडतात. महानगरीय जीवनात झालेली बरी वाईट स्थित्यंतरे त्यांच्या कथेचे विषय होतात. मुळात पाध्ये आपल्या कथेचे आशयद्रव्य वास्तवातून निवडतात. त्यांच्या कथा ह्या अवती-भावतीच्या माणसांच्या अकृत्रिम कथा असतात.

पूर्वीच्या कथा लेखकांनी जसे रूढ चित्रण केले आहे तसे पाध्ये आपल्या कथेत करत नाहीत. ठराविक भावसंबंध चित्रित करण्यापेक्षा अनेकदा अनपेक्षित भावसंबंध चित्रित करून अभिप्रेत आशयाचा प्रत्यय देतात. कधी कधी हे चित्रण फॅंटसीच्या स्वरूपाचे वाटावे असेही असते. कुटुंबप्रमुख पदाचा राजीनामा देणारा पुरूष ते चित्रित करतात. मात्र या प्रकारचे चित्रण करून अलक्षित वास्तवाचा प्रत्यय देणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट असते. पण हे अनपेक्षित भावसंबंध चित्रण त्यांच्या कथेत अवास्तव वाटत नाही. कारण त्यातही व्यापक सहानुभाव व मानवतावादी दृष्टिकोन असतो. याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या कथांच्या आधार घेता येईल.

## जगण्यातील अंत:प्रेरणा:

पाध्ये काही कथांतून अंत:प्रेरणेने जीवन जगण्याचा प्रयत्न करणारी पात्रे चित्रित करतात. "मला या क्षणी असं जगावसं वाटतं" असे वाटण्यातून ती स्वत:च्या नैसर्गिक इच्छेनुसार जगणारी पात्रे पाध्ये निर्माण करतात. त्यांच्या "ठेच" कथेतील अनुसयाबाई याचे एक चांगले उदाहरण होऊ शकेल. त्या एका विशिष्ट भावावस्थेत शिरडीत अप्पाशी संग करतात. कदाचित त्यावेळी ती त्यांची गरज असू शकेल. पण नंतरच्या कालावधीत

त्यांना अप्पाची गरज वाटत नाही. त्या त्याला झिडकारतात. शिरडीत काहीच घडले नाही असे वागतात. त्यांना त्यात रसही नसतो. त्यामुळे नको असलेली गोष्ट त्या सहज नाकारतात. किंवा "वसुंधरा" कथेतील वसुंधरा रिसबुडने बसवलेल्या नाटकात काम स्वीकारते. तिला वाटतं की रिसबुड पासून आपण शारीरसुखा मिळवावं. ती ते मिळवते. ते ही रसिकपणे. त्यामुळे ती सहज बोलून जाते --"छे - छे इथे नाही...आज बाथरूममध्ये"[१] यामध्ये तिला जे वाटले तसा तिने जगण्याचा प्रयत्न केला. जेव्हा तिला "दिवस" जातात तेव्हा तिला नाटकाची, रिसबुडची गरज वाटत नाही. ती तालमींना जाणं बंद करते. यात आपण काही वावगे करत आहोत असं तिला अजिबात वाटत नाही. म्हणजेच जगत असताना या पात्रांच्या आड रूढ नैतिक संकेत येत नाहीत. आले तरी ते त्यांना महत्त्वाचे वाटत नाहीत. "बेबी" कथेतील निवेदक मी - बेबी त्याला आवडल्यामुळे तिचा पाठलाग करत असतो. आवडलेली गोष्ट आपली असावी ही त्याच्या जगण्यातील, अंत:करणात निर्माण झालेली प्रेरणा. ती त्याला "काका" म्हणण्याइतके त्याच्या वयात अंतर असूनही तो तिचा पाठलाग करत असतो. तर "बेसुरा" कथेतील नायक भास्कर तिळवे लोकलमधून, चर्चगेट ते त्याच्या ऑफिसपर्यंत रस्त्यातून हातवारे करत मोठ्याने गात असतो. त्याला त्या गाण्यात जगण्याचा आनंद मिळत असतो. तर हाच बेसुरा मनोरमाबाई राशिनकरांच्या ऑपरेशनसाठी स्वत:ची खोली कोणताही विचार न करता सहज विकून टाकतो. यात त्याच्या नितळ, स्वच्छ मनाचा सूर अधिकच उजवा आणि वरचा दिसतो. "थिएटर" मधील विकास रेवाशी लग्न लावण्याची लोकांची सक्ती होतेय असं वाटून बेवडा ठोकत असतो. त्याला ती सक्ती मान्य नसते. त्याला त्याचे आयुष्य इतरांच्या इच्छेप्रमाणे जगण्यापेक्षा अंत:प्रेरणेने जगायचे असते.

पाध्ये यांच्या कथेतील अशा पात्रांना हे अंत:प्रेरणेतून जगणे महत्त्वाचे वाटते. यात त्यांना रूढ संकेत परंपरा बाधा आणू शकत नाही. ती त्यांना महत्त्वाची मानून जगणे मर्यादित करावे असेही वाटत नाही.

सच्चेपणा:

पाध्ये यांचे लेखन हे व्यापक सहानुभाव असणारे मानवतावादी लेखन असल्यामुळे जगण्यातील सच्चेपणालाही ते महत्त्वाचे स्थान देतात. प्राप्त झालेले जीवन व्यक्ती किती प्रामाणिकपणे, सच्चेपणाने जगते याच्या चित्रणाला ते महत्त्वाचे स्थान देतात.
खोटेपणा, ढोंगीपणा यातून व्यक्ती स्वत:चे स्वातंत्र्य मर्यादित करत असते. जगण्यावर अपरिहार्य मर्यादा येतात. त्यामुळे जगण्यातील निर्मळपणा नाहीसा होतो. पाध्यांना स्वच्छ, निसर्गक्रमाने जगणे महत्त्वाचे वाटते. त्याचे सूचन ते आपल्या कथांतून करतात. पाध्ये यांच्या कथातील पात्रे सच्चेपणाने जगण्याचा प्रयत्न करतात.
त्यांच्या "नवरा" कथेतील काकू आपला नवरा नपुसक असल्यामुळे नरेंद्राशी संबंध ठेवते. तिला तिच्या शरीराचा निसर्गक्रम थोपवणे योग्य वाटत नाही. प्रामाणिकपणे सच्चेपणाने जगण्यात तिला रूढ नैतिकता सांभाळावी असे वाटत नाही.
तसेच "अक्करमाशा" कथेतील अन्याची आई आपला नवरा शेवटचे क्षण मोजत असताना साडीचा स्टॉक मोजत असते. अन्याला तिच्या या वागण्याचा राग येतो तेव्हा ती म्हणते "मग, मी काय करु ? मला कंटाळा आला. त्यांच्याकडे नुसतं पहात बसून बसून."[२]
या ठिकाणी तिच्या नामर्द नव-याविषयी तिच्या मनात कोणतेच प्रेम नसताना जगासाठी म्हणून त्याच्याकडे पहात बसणे तिच्या स्वभावाला मानवत नाही.

"सांड" कथेतील गजा मारुळकर या चित्रकाराला आईबद्दल तिरस्कार आहे. "हो. जन्म दिल्यामुळे ती माझी आई झाली एवढंच."[३] असं तो म्हणतो. यात आपण आईबाबत रूढ नैतिकतेनुसार अनुद्गार वगैरे काढत आहोत असं त्याला वाटत नाही.

"कुटुंब" कथेतील निवेदक-मी जगण्यातील सच्चेपणाला अधिक महत्त्व देतो. तो म्हणतो --"मला कुटुंब व्यवस्थेत जगणे भयाण वाटेल. सुंदर मुलगी पाहून तिला माझ्या पत्नीपेक्षा न मानणे मला अप्रमाणिकपणाचे वाटेल."[४] त्याला खोटेपणा नको वाटतो. त्याची मुलगी नीता, गोस्वामी पासून गरोदर असते. त्याला स्वतःला तिचा गर्भपात करणे म्हणजे ढोंग वाटते. तो करत नाही. "थालीपीठ" कथेच्या नायक मधू नीना सरवटेला तिने केलेले थालीपीठ आवडले नाही हे चक्क तिच्या तोंडावर सांगतो. यात आपण काही चूक करत आहोत असे त्याला वाटत नाही.

पाध्येच्या कथांतील वरील उदाहरणे घेतल्यास आपल्या असे लक्षात येते की ही सारीच पात्रे जगण्यातील सच्चेपणाला अधिक महत्त्व देतात. त्यांना खोटेपणाने जगणे जमत नाही. थोडक्यात त्यांना रूढ नैतिकतेच्या डोलाऱ्याला सांभाळता सांभाळता आपल्या व्यक्तिमत्वाला मर्यादा घालणे जमत नाही. त्यामुळे ती सर्वच निसर्गक्रमाने सरळ, स्वच्छ जगू इच्छितात. जगतात.

स्वातंत्र्य:
------

पाध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याला अत्यंतिक महत्त्व देतात. या ठिकाणी व्यक्तिस्वातंत्र्य हा शब्द अठराव्या-एकोणिसाव्या शतकातील मिल्, स्पेन्सर अथवा महाराष्ट्रातील आगरकर संप्रदायाला अभिप्रेत असलेल्या अर्थाने वापरलेली नाही. सार्थ या विचारवंताला अभिप्रेत

असणा-या अर्थाने व्यक्तिस्वातंत्र्य हा शब्द वापरला आहे. या त्यांच्या भूमिकेच्या मूळाशी "व्यक्तीचे स्वातंत्र्य" ही कल्पना असल्याचे आपल्याला दिसते. व्यक्तीचे स्वातंत्र्य हा त्या व्यक्तीच्या जगण्याचा गाभा असतो. जर या स्वातंत्र्यावरच मर्यादा आल्या तर त्या जगण्याला कोणत्याच प्रकारचा अर्थ उरत नाही. ते जगणे हे अर्थहीन, पराकोटीचे ढोंगी बनत असते. पाध्यांना इतरांच्या आदेशान्वये जगण्यापेक्षा स्वत:च्या जबाबदा-या ओळखून व त्या पत्करून जगणे महत्त्वाचे वाटते.

त्यामुळे सर्वच भूमिकानिष्ठ लेखक व्यक्तीच्या स्वातंत्र्याला अधिक महत्त्व देत असतात. या लेखकांची ही भूमिका व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेतूनच उगम पावलेली आपल्याला दिसते. या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कल्पनेतून समूह स्वातंत्र्याची कल्पना अपेक्षित असते.

पाध्ये आपल्या सर्वच गद्य लेखनातून हे व्यक्तीचे स्वातंत्र्य महत्त्वाचे मानतात. या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच ते आपल्या साहित्यात करत नाहीत. त्यांच्या लेखन भूमिकेच्या मुळाशी व्यक्ती-स्वातंत्र्य ही कल्पना असल्यामुळे त्यांच्या लेखनातून आपल्याला त्याची प्रचिती येते.

पाध्ये यांच्या कथांचाच फक्त विचार करावयाचा झाला तर त्याची बहुसंख्य कथेतील पात्रे ही "स्व" स्वातंत्र्य आबाधीत ठेवून जगण्याचा प्रयत्न करत असतात.
त्यांच्या "कुटुंब" कथेतील नायक आपल्या पत्नीला तू इच्छा असेल तर दुसरा नवरा करायला हरकत नाही असे सहजपणे सांगून टाकतो. यात त्याला तिचे स्वातंत्र्य महत्त्वाचे वाटते. स्वत: जगत असतानाही तो आपले व्यक्तिगत स्वातंत्र्य महत्त्वाचे मानतो. एका ठराविक वयानंतर आपण वैद्यकीय व्यवसाय केला तर आपल्या स्वातंत्र्यावर मर्यादा येणार असे वाटल्यामुळे

तो आपला प्रचंड प्राप्तीचा व्यवसाय बंद करुन टाकतो. "पडदा" कथेतील मैमूना बाकरमिया या म्हाता-या नव-यापासून आपल्याला कोणतेच सुख मिळत नाही. त्याच्यामुळे आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो असे वाटल्या मुळे बंड करुन जगण्याचा प्रयत्न करते. या ठिकाणी तिला तिच्या स्वातंत्र्याला मर्यादा येणे योग्य वाटत नाही. किंवा "ठेच" मधील अनुसयाबाईला शिरडीहून आल्यानंतर आप्पामुळे आ पले जगण्यातले स्वातंत्र्य गमवावे असे वाटत नाही. ती सहजपणे आप्पाला नाकारते.

"गुदाम" कथेतील येसू आपल्या स्वातंत्र्यासाठीच म्हाता-या सास-याचा खून करुन पळून जाते. "आयशीचे हृदय" मधील वच्ची आई आपल्या स्वातंत्र्यावर गदा आणते असे पाहून हिरोचा हात धरुन पळून जाते. उलट आईला धमकी देते की पाठलाग केलीस तर वाईट होईल.

या पात्रांच्या माध्यमातून पाध्येंना व्यक्तीस्वातंत्र्याची कल्पना मांडायची आहे. पण हे स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. याठिकाणी त्यांच्या कथेतील कोणतेच पात्र या अर्थी जगत नाही.

पाध्ये आपल्या लेखनातून पारंपारिक रुढ नैतिकतेला बाजूस सारुन निसर्गक्रमानुसार विचार रुढ करु पहातात. त्यामुळे त्यांचे ते जगणे स्वैराचारीनाही तर निसर्क्रमानुसार असल्याचे जाणवते.

त्यांच्या "एक सुन्हेरा ख्वाब" कथेतील अनिलचे विचार येथे विचारात घेण्यासारखे आहेत तो म्हणतो --

"सत्याग्रह खुशाखुशी केला नाही. ठरवून केला. नॉट फॉर प्लेझर ! तुम्ही बाहेर जा, मग तुमच्या लक्षात येईल की तिथं ही तुम्ही तुरुंगात असता. पण मोठ्या ! त्या तुरुंगामधून या तुरुंगात आलो. परवा

मी ट्रेननं चाललो होतो तुम्हाला माहित नसेल••• पण आता सिग्रेट स्मोक करायला बंदी आहे ••••  आता अशी कल्पना करा की अशी बंदी तुरुंगात घातली तर काय कराल ? ••••तुम्ही सिगरेट पिणार नाही आणि उघडपणे प्याला तर तुमचे डोळेच सांगतील मी अपराध करतोय, म्हणून. मी ज्या ज्या वेळी सिगरेट प्यायचो त्या त्या वेळी माझ्याकडे असेच डोळे लागायचे. मी गुन्हा करतोय. मी गुन्हेगार आहे. आणि रेल्वे अधिका-यांपेक्षा त्यांचाच तुरुंगवास मला जाचायचा •••••  आपले लोक कायद्यापुढे वाकतात, नमतात हेच इंदिरा गांधीला ठाऊक होते आणि म्हणून तिने आणिबाणी आणून••• सर्व देशाचा तुरुंग करून टाकला. मला तिच्यासमोर वाकायचे नव्हते. बस्स!"[५]

या अनिलच्या बोलण्यातून आपल्याला त्याला त्याचे व्यक्तिगत स्वातंत्र्य किती महत्त्वाचे वाटते याची कल्पना येते. या ठिकाणी लोकांचे डोळे ही रुढ नैतिकता असे जरी समजले तरी त्याच्या बोलण्याचा सर्वच रोख आपल्या लक्षात येतो.

पाध्ये अशा त-हेने व्यक्तीचे स्वातंत्र्य हे आपल्या लेखनात महत्त्वाचे मानतात. म्हणण्यापेक्षा त्यांचे सर्व लेखन या व्यक्ती - स्वातंत्र्याच्या कल्पनेभोवतीच विकास पावलेले दिसते.

## स्त्री-पुरुष संबंधाकडे पहाण्याचा मोकळेपणा:

पाध्यांच्या भूमिकेला स्त्री-पुरुष संबंध हे विविध बंधनांनी आणि खोट्याकल्पनांनी त्याज्य मानणे अव्यवहार्य वाटते.

स्त्री-पुरुष संबंध हा एक नैसर्गिक व्यवहार आहे. ती माणसाची एक नैसर्गिक गरज आहे. त्यामुळे या व्यवहाराकडे पहात असतानाही तो

एक नैसर्गिक व्यवहार म्हणून पहावा किंवा त्याचा विचार व्हावा असे पाध्ये यांना वाटते.

मुळात समाजाची नैतिकता ही लैंगिकतेवरच बहुंशी ठरत असते. किंवा ठरलेली आहे. भारतीय रुढ परंपरेत योनीशुचितेची कल्पना केंद्रभागी मानून व स्त्रीचे वस्तूमूल्य मान्य करुन नैतिकता ठरवली गेलेली आहे. त्यामुळे आपल्याकडील लैंगिक व्यवहाराकडे बघण्याची दृष्टी संकुचित व आत्यंतिक विकृत स्वरुपाची होऊन गेलेली आहे.

या समाजाचे श्लील-अश्लीलतेचे सर्वच नियम या लैंगिक व्यवहाराशी निगडीत ठेवले गेले आहेत. त्यामुळे या शब्दांचाही अर्थसंकोच झालेला आहे. मानवाला एक नैसर्गिक शरीर आहे. त्या शरीराला असणारे अवयव नैसर्गिक आहेत. पण कोणता अवयव श्लील आणि कोणता अश्लील हे आपल्याकडे लैंगिक व्यवहारावरुनच ठरवले गेले आहे. त्यामुळे एकूणच जगण्याला या लैंगिकतेच्या रुढ कल्पनानी किंवा पारंपारिक नैतिकतेने कुंपने घातलेली आहेत.

यामुळे आपल्या संस्कृतीतील जगण्यात लैंगिकसंबंध हे नैसर्गिक न मानता अश्लील मानले गेले आहेत. त्यामुळे लैंगिक व्यवहाराविषयी नको तितका बंधनाचा दाब व्यक्तीच्या जीवनव्यवहारावर पडलेला आहे. त्याखाली दडपलेल्या लैंगिक व्यवहारातून भारतीय संस्कृतीत अनेक विकृती जन्म पावलेल्या दिसतात. या विकृत समजांवरच समाजाची पारंपारिक नैतिकता तयार झालेली आहे. पण पाध्येंच्या भूमिकेला हे अपेक्षित नाही. याचे अधिक विश्लेषण आपण पाध्ये यांच्या कथेच्या आधारेच करु. पाध्ये स्त्री पुरुष संबंधाकडे, रुढ कल्पनेपेक्षा वेगळ्या दृष्टिकोनातून पहातात. अमुक एक स्त्री-पुरुष संबंध पापी आणि अमुकएक हे समाजमान्य असा दृष्टिकोण

पाध्यांचा नाही. ते सर्वच स्त्री-पुरुष संबंधाकडे नैसर्गिक व्यवहार म्हणून पहातात.

त्यामुळे त्यांच्या कथांतील स्त्री-पुरुष संबंधाला वेगळेपण प्राप्त होते. पाध्ये यांच्या "नवरा" कथेतील काकू आपला नवरा नपुंसक असल्यामुळे नरेंद्राच्या सलगीत जाते. या ठिकाणी ती आपल्या शरीराची कोंडलेली भूक भागवण्यासाठी नैसर्गिक वाट शोधते. तिने तशी वाट शोधण्यात काहीच गैर नाही.

किंवा "ठेव" कथेच्या नायकाला - आप्पाला - अनुसयाबाई आवडलेली असते. तो विवाहित आहे पण त्या स्त्रीविषयी आसक्ती वाटणे नैसर्गिकच आहे. तो म्हणतो, "बाई चांगली होती. आपण तिच्यावर खुष होतो आणि संधीची वाट पहात होतो."[६] या त्याच्या वाटण्यात किंवा त्याच्या मनात असे विचार येण्यात गैर काय ? हाच या ठिकाणचा प्रश्न आहे. या नायकाला तर यात काही गैर आहे असं वाटत नाही. तो नैसर्गिकरित्या वागतो. "गुदाम" कथेतील येसू आपल्या नपुंसक नव-याजवळ रहात असताना सास-याने जबरदस्ती केली. तिला ती मान्य झाली नाही. म्हणून त्याचा डोक्यात दगड घालून खुन करते. तीच येसू एडेकराशी मात्र स्वेच्छेने संबंध ठेवते. "अक्करमाशा" कथेतील मन्याची आई आपल्या नपुंसक नव-याला सांभाळत तावडेशी संबंध ठेवते. "फाईव्ह गार्डन"मधील माई टुकल रजिस्टर वेश्या आहे पण जवानाशी मात्र स्वेच्छेने व अत्यंत प्रामाणिकपणे मन लावते. "अनुभव" मधील अनु पुन्हा सुधाकाकूकडे जायला लागू नये म्हणून म्हाता-या मुसलमानाला आपलेसे करते. "थालीपीठ"चा नायक नीना सरवटे आवडल्यामुळे तिच्याकडे चुंबनाची मागणी करतो. "सांड" मधील मालती गजा मास्तरला देण्यासाठी आपल्या शरीरावर काहीतरी मास शिल्लक रहावे म्हणून प्रयत्न करत असते.

ही सारीच पात्रे पारंपारिक नैतिकता बाजूस सारून जगू इच्छितात. म्हणजेच त्यांना लैंगिकता हा निसर्गधर्म म्हणून स्वीकारावासा वाटतो. तो निर्मळ आणि नैसर्गिक म्हणून त्याकडे ही सर्व पात्रे पहातात.
यात आपण काही पाप करत आहोत असं त्यांना वाटत नाही.
या सर्वच पात्रांच्या जगण्यातून पाध्ये आपली भूमिका आविष्कृत करतात.
लैंगिकतेकडे पहाण्याची आपली दृष्टीही प्रत्ययाला आणून देतात.

प्रतिष्ठा:
======

रूढ परंपरागत नैतिकतेचे पालन करत जगणारी माणसे ही बाह्य प्रतिष्टेसाठी जगत असतात. त्यामुळे त्यांच्या जगण्यातील "सत्व' हरवलेले असते. "लोक काय म्हणतील ? लोकांना हे बरे दिसेल का ? लोक लाजेखातर असं वागलं पाहिजे" हेच त्यांच्या जगण्याचे तत्त्वज्ञान होऊन बसते आणि यामुळे त्यांच्या जगण्यावर मर्यादा येऊ लागतात. जगण्यात खोटेपणा येतो व हा खोटेपणा सांभाळण्यासाठी ही माणसे पराकोटीचे प्रयत्न करू लागतात. या सगळ्यात त्यांना नैसर्गिक व सच्चेपणाने जगता येत नाही. त्यामुळे जगण्याचे ढोंग त्यांना अखंड चालवावे लागते.

पण जी व्यक्ती सच्चेपणाने, अंत:प्रेरणेने जगू इच्छिते तिला या रूढ नैतिकतेचा अडसर वाटू लागतो. ढोंगी जगणे त्यांना तकलादू वाटू लागते. त्यामुळे बाह्य प्रतिष्टयेची तमा न बाळगता या व्यक्ती स्वेच्छेने सच्चेपणाने जगण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांना खोटेपणा, ढोंगीपणा, लोक काय म्हणतील इ. प्रश्न टाकाऊ वाटत असतात. त्यांची तमा बाळगुन जगणे त्यांच्या तत्वज्ञानात बसत नाही. अशी माणसे किंवा अशा व्यक्ती-रेखा भूमिकानिष्ठ लेखकांच्या लेखनात येत असतात.

भाऊ पाध्ये यांच्या कथांमध्ये येणा-या व्यक्तिरेखा अशा स्वरूपाचे जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांना खोटी प्रतिष्ठा तकलादू वाटत असते. याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या कथा वाचताना येतो. अन्याचे अण्णा मेल्यानंतर त्यांची प्रेतयात्रा निघते तेव्हा अन्याची प्रिया पुष्पा आपल्या बापाला म्हणते - "अय्या, केवढी माणसं जमली आहेत अण्णांच्या प्रेत यात्रेला. नानाजी, तुम्ही जा. तुम्ही गेला नाहीत तर उद्या बरं दिसणार नाही"[६] या तिच्या बोलण्यातून तिला लोक लाजेची, प्रतिष्ठेची भीती वाटू लागते. पण उगाच अशा माणसाच्या प्रेत-यात्रेला जाणं त्यांना पसंत पडत नाही. ते जात नाहीत. त्यांच्या या वागण्यातून पाध्ये आपली भूमिकेचा आविष्कार करतात.
"कुटुंब" कथेतील निवेदकाचा - डॉक्टरचा मुलगा भजी सेंटर काढतो. डॉक्टरचा मुलगा डॉक्टर इत्यादी उच्चपदस्थ; हा आपल्याकडील रूढ संकेत पण निवेदकाला त्याची तमा वाटत नाही. तो मुलाला बेलाशक भजी सेंटर काढण्यास परवानगी देतो. त्याची मुलगी फिल्मी पत्रकार होते. त्याला काहीही म्हणायचे नसते. ती जेव्हा गोस्वामीबरोबर राहून गरोदर रहाते तेव्हा त्याची पत्नी या निवेदकाला - डॉक्टरला गर्भपात करण्यास सांगते पण तो म्हणतो- "नीताला दिवस गेले आहेत हे सगळ्या जगाला ठाऊक आहे. आता तिचा गर्भ पाडून का तिला उजळमाथ्याने फिरता येणार ?"[७] उलट त्याच्या मते नीताने होईल ते मूल वाढवावे. पण हे मत तो तिच्यावर लादत नाही. या ठिकाणी त्याला रूढ नैतिकतेची चौकट मान्य करावी असं वाटत नाही. त्यामुळं तो आपल्या जगण्यापुरती ती चौकट मोडून जगू इच्छितो.

"ठेच" कथेतील अनुसूयाबाईला नैतिकतेतील ढोंगीपणा, प्रतिष्ठेच्या कल्पना मान्य नाहीत. त्यामुळे जगण्याला मर्यादा आणणारे संकेत ती टाकून देते आणि सच्चेपणाने जगण्याचा प्रयत्न करतात.

पाध्ये आपल्या या पात्रांच्या नव-प्रतिष्ठयेच्या कल्पना वाचकांसमोर ठेवून आपल्या भूमिकेचा आणाखी एक पैलू दर्शीत करतात.

धर्म:

धर्म ही बाब व्यक्तित्वाला मर्यादा आणत असेल तर त्यीही गोष्ट व्यापक मानवतावादी सहानुभावात तकलादू मानली जाते. धर्म हा सच्चे-पणाला जगण्यातील अंत:प्रेरणोला बाधा निर्माण करत असेल तर तीही संकल्पना त्यांना त्याज्य वाटते.

पाध्ये यांच्या कथेत आपल्याला अशी उदाहरणे दाखवता येतील. त्यांच्या "संकेत मिलनाचा" हया कथेत निवेदक - दिनू म्हणातो, "म्हणाजे एखादयाला बायको हयात असून दुसरे लग्न करायचे असते. आम्ही त्यांना हाच उपाय सांगतो. धर्म बदला. मुसलमान धर्मात चार बायका करता येतात. एका पुरुषाला. हो ! इथे महत्त्वाचा सवाल असतो, धर्म महत्त्वाचा की तुम्हाला हवी असलेली बायको महत्त्वाची."[८] येथे दिनूच्या दृष्टीने धर्माला महत्त्व व्यक्तीच्या जगण्यापेक्षा अधिक नाही. तसेच त्यांच्या "अनुभव" कथेतील अनु ही सुधाकाकूच्या घरातील मुलगी छळाला कंटाळून त्यांच्या घरातून पळून जाते व मुसलमान घरात नोकरी पत्करते. परत जेव्हा सुधाकाकूच्या घराकडे जावे लागेल असे वाटते तेव्हा ती रहिमतखां या मुसलमानाशी लग्न करते. तेव्हा सुधाकाकू एका म्हाता-या मुसलमानाने एका कोवळ्या हिंदू मुलीशी लग्न केले हे रंगवून सांगतात. पण आपण तिचा किती छळ केला हे मात्र सांगत नाहीत. फक्त ती त्या धर्मातील माणसं वाईट असतात हे समर्थन आपल्या अमानुषतेला लपवण्यासाठी करत असते. वाईट चालीची म्हणात असते. पण ती तशी नसते. ठेच कथेतील "अनुसयाबाई" प्रामाणिकपणे जगत असते तरीही लोक तिच्याविषयी बोलत असतात. आप्पाला त्या बोलणा-या समाजाचे काहीच विचारात घ्यावे असे वाटत नाही. तो तिच्याकडे जाणे-येणे वाढवतो.

"वसुंधरा" कथेतील रिसबुड वसुंधरे संदर्भात बोलताना म्हणतो, "जर मला जे पाहिजे ते मिळत होते तर मग मी इतरांची पर्वा का करावी ? माझा त्यांच्या स्टेनलेसस्टील नीतीवादावर विश्वास नाही"[९] त्याला लोक आणि आपली प्रतिष्ठा याची फिकीर करण्याची गरजच वाटत नाही. "आपण स्त्रीच्या हातात आपले दावणे देऊन बसतो"[१0] हे त्याला मान्य नाही. लोक लाजेखातर बायकोची प्रत्येक गोष्ट स्वीकारणे त्याला योग्य वाटत नाही. तो मान्य करत नाही.

"थालीपीठ" कथेतील मधुला या इंटलेक्युअल मंडळीचा ढोंगीपणा आवडत नाही. त्याला त्यांच्या प्रतिष्टेसाठी चाललेल्या वांझ चर्चा खोट्या वाटत असतात. एखादयाची एखादी गोष्ट न आवडूनही तिला चांगले म्हणणे त्याला जमत नाही. मुळात या मधुला लोकांच्या साठी जगणं ही कल्पनाच मान्य नाही.
नीना सरवटे प्रतिष्ठेचा बुरखा सांभाळण्यासाठी आपल्या शरीराला, मनाला दाबत असते. खोटा कांगावा करून जगण्याचा प्रयत्न करत असते. "पंपीलॉन मधल्या लेपरच्या अंगठ्याप्रमाणे तुझ्या जीवनातील सेक्सचा भाग याला चिकटून आलाच का पाहयलं"[११] एवढं बोलून तो तिचा दिखाऊ ढोंगीपणा सहज उघडा पाडतो.

"संकेत मिलनाचा" कथेतील दिनू आपल्या बायकोला स्वच्छ सांगतो तू मला आवडत नाहीस तू मला नकार दे. या ठिकाणी स्त्रीने पुरूषाला लग्नाचा नकार देणे ही बाब त्याला प्रतिष्ठेची कल्पना वाटत नाही.
थोडक्यात पाध्ये हे खोट्या प्रतिष्ठेला जपण्याचा प्रयत्न करत नाहीत. ढोंग करून जगणे त्यांना सोसवत नाही. अनुसारख्या छोट्या मुलीला धर्म महत्त्वाचा वाटत नाही तर आपले स्वातंत्र्य महत्त्वाचे वाटते. "बेबी" कथेतील नायक बेबीसाठी मुसलमान व्हायला तयार होतो.

या उदाहरणांवरून आपल्याला असे दिसेल की धर्म ही कल्पना व्यक्तिस्वातंत्र्याला मर्यादा घालणारी असल्यास तिचाही फारसा उपयोग जगण्याला होत नाही असे मानून तो ही झिडकारण्याची भूमिका कथेतून सूचित करतात.

येथवर आपण पाध्ये हे व्यापक सहानुभाव असणारे मानवतावादी लेखक आहेत. त्यांच्या कथांतून ही त्यांची भूमिका आविष्कृत होते. याच भूमिकेला भालचंद्र नेमाडे "नवनैतिकतावादी" भूमिका अशी संज्ञा वापरतात. ही संज्ञा स्वीकारून पाध्यांना नवनैतिकतावादी भूमिका असणारे लेखक असेही म्हणता येईल. कारण या भूमिकेत अभिप्रेत सर्व पैलू आपल्याला पाध्यांच्या कथेत सापडतात.

## चित्रण विषयातील वैविध्य:

### प्रास्ताविक:

पाध्ये यांच्या कथेतून नवनैतिकता मुलभूत स्त्रोत म्हणून, कथेचा गाभा म्हणून आविष्कृत होते. त्यांच्या लेखनीचे ते मूलभूत वैशिष्टय आहे.

या प्रमाणेच पाध्ये यांच्या कथेला कोणत्याच विषयाचे वावडे नाही. जीवनातील विविध क्षेत्रे ते आपल्या लेखनासाठी निवडतात. म्हणण्यापेक्षा वेगवेगळ्या जीवनाचे व्यापक विश्व त्यांच्या कथेचे आपोआप विषय होतात.

मुंबईच्या महानगरी जीवनात अनेक वेगवेगळी विश्वे सामावली आहेत. अनेक नवनव्या वस्त्या, वसाहती येथे नित्य नव्याने अवतरत असतात. प्रत्येक वस्ती म्हणजे एक स्वतंत्र विश्व असते. त्या विश्वातील जगण्याच्या पध्दती, रुढी, परंपरा, नीती, नियम यातही वेगवेगळेपणा असल्याचे दिसून येते.

अठरा-पगड जाती या महानगरीत एकत्रित झालेल्या आहेत. येथे एकमेकाच्या वर्तन संस्कृतीचे विलक्षण मिश्रण झालेले आहे. त्यातूनच नवनव्या सांस्कृतिक घडामोडी येथे जन्म पावत आहेत.

मुंबईच्या गतिमानतेने माणसालाप पूर्णत: गतीमान बनवले आहे. त्याच्या धाकाधाकीच्या जीवनाचे प्रश्न वेगवेगळ्या प्रकाराने व्यामिश्र होत आहेत. याबाबत दि.पु. चित्रे म्हणतात -- "ग्रामीण महाराष्ट्रातील जीवन, नागरी महाराष्ट्रातील जीवन, आणि महानगरी महाराष्ट्रातलं जीवन यात आज इतके फरक पडलेले आहेत की एकीकडचा जीवनबंध दुसरीकडे अनाकलनीय ठरावा. आश्चर्याची गोष्टी ही की मुंबईतील महानगरीय जीवनात खेड्या-तून आणि लहान शहरातून येणारे धागे सतत मिसळत असतात. औद्योगिक शहरातल्या व्यावहारिक जीवनाखालचं मूळ सांस्कृतिक अस्तर ठिकठिकाणच्या प्रादेशिक जीवनातून आलेलं आहे. व्यवहार फाटतात किंवा धासतात तेव्हा अस्तर दिसतं. भाऊ पाध्ये यांच्या कथाविश्वाला सार्वभौमत्वाचा स्पर्श आहे तो ह्या संस्कृतीमुळे. मुळ मराठी संस्कृती आणि औद्योगिक महानगरीय जीवन व्यवहार यांच्यातले रिश्ते आणि दुवे भाऊंच्या कथा विश्वात सापडतात"[१२]

भाऊ पाध्ये यांच्या कथेत मुंबई महानगरीची सर्व अंगोपांगे आलेली दिसतात. याचे कारण त्यांचा जीवनाकडे आणि लेखनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन आहे.

त्यांची प्रत्येक कथा मानवीजीवनाचे नवे विश्व दर्शन घडवते. या विधानाची सत्यता त्यांच्या कथातून पडताळू.

## १) सामान्य माणसाचे जीवन:

पाध्ये यांच्या कथेत मुंबईतील सामान्य माणूस संपूर्ण वास्तवासहीत आलेला आपल्याला दिसतो. मुंबईतील ही सामान्य माणसे पोटासाठी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

थव्याथव्यानं मुंबईकडे आलेली आहेत. त्यांच्या जगण्यात त्या त्या भूप्रदेशाचे संस्कार, रूढी, परंपरा जशाच्या तशा बसलेल्या आहे. पाध्ये यांच्या "पायातला बूट", "बायका खाणारी माणसं", "बगीचा", "अक्करमाशा", "ओळख" या कथातून येणारी बाबू, बंडू अवदारे, अन्याची आई, भास्करराव राणे, ही सारी माणसे सामान्य आहेत. त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड. त्यांच्या जीवनाचे विविध प्रश्न, त्यात त्यांचे धुसमटलेले जीवन या सा-याचेच वास्तवपूर्ण चित्र भाऊ पाध्ये आपल्या कथेत रेखाटतात.

२) <u>मध्यमवर्ग:</u>

मुंबईत सामान्यपणे जीवन जगणारी माणसे जशी जगण्यासाठी धडपडताना दिसतात. तसाच इथला मध्यम वर्ग आपली संस्कृती, मूल्ये, नीती यांना कवटाळून जगण्याच्या प्रयत्नात असलेला दिसतो. भाऊ पाध्ये "टॉयलेट" देश पुढे गेला", "बेसुरा", "संकेत मिलनाचा", "साप", "अनुभव" इ. कथांमधून या जीवन विश्वाचा वेध घेताना दिसतात. कधी वास्तव स्वरूपात ते तिथल्या जीवनाचे गुंते वाचकासमोर मांडतात. तर कधी उपहासाने त्या जीवनातील खोटेपणा दाखवतात.

३) <u>उच्चवर्गीयांचे जीवन:</u>

मुंबई शहरात असणारा उच्चभ्रू लोकांचा एक थर आहे. या माणसांच्या जगण्यात सत्ता, संपत्ती, वैभव यांची रेलचेल आहे. या जगण्यात अनेक विकृती पोसल्या गेल्या आहेत. या सा-याचे चित्र पाध्ये "पासवर्ड" "डॉक्टर कुमारी", "थालीपीठ", "थिएटर", "वेड", इ. कथांमधून उभे करतात. या जीवनातील प्रतिष्ठित चाळे, स्वैरपणा या बरोबरच इथला कोंडमाराही त्यांच्या कथेचा विषय होतो.

४) कामगार विश्व:

पाध्ये मुंबईतील विविध कामे जसे आपल्या कथांमधून वर्णन करतात तसेच ते मुंबईतील कामगार जीवनाचे चित्रण ही आपल्या कथेत करतात. "बगीचा" कथेतील भास्करराव सामान्य कारकून आहे. "एक सुन्हेरा ख्वाब" मधील बंड्या, सिताबीन, नरश्या हे गिरणीतले कामगार आहेत. तर "बेसुरा" मधील भास्कर तिळवे सामान्य कारकून आहे. या कथांच्या-मधून पाध्ये मुंबईतील कामगार जीवनाचे यथार्थ चित्रण करतात.

५) राजकीय जीवन:

राजकीय जीवन हा तर पाध्ये यांच्या चिंतनाचा विषय. "स्व.देशभक्त काका" "देश पुढे गेला" या कथांच्या मध्ये ते हा विषय सांगोपांगरित्या मांडतात. तर "पोल्ट्री फार्मिंग" कथेत राजकीय पक्षात कार्यकर्ता म्हणून जाणाऱ्या टिपटोळकरची शोकान्तिका चित्रित करतात. अनेक इतर कथांमधून हे जीवन पुन्हा वेगवेगळ्या तऱ्हेने येते ते वेगळेच.

दुबळ्या झोपडपट्टीयांचे विश्व:

भाऊ पाध्ये यांच्या एकूणच लेखनात मानवता आणि सामान्यांविषयी-ची आत्मीयता दिसून येते. त्यांच्या कथेत मुंबईतील विविध कामांबरोबरच मुंबईतील झोपडपट्टया, वेश्यावस्ती, तुरुंग, याबरोबरच विविध जाती-जमाती यांचे चित्रण येते. त्यांच्या कथांतून या विश्वाच्या विविध समस्याही पाध्ये तळमळीने पण तटस्थपणे मांडतात. त्यांच्या "तेरी भी चूप मेरी भी चूप", "चलोनावाली" या कथातून वेश्याजीवनाचे साकल्याने दर्शन होते तर "नवरा", "अक्करमाशा" या कथातून नपुसक पती प्राप्त स्त्रीयांच्या भावनिक कोंडमाऱ्याचे चित्र येते. "मुरगी", फाईव्ह गार्डन"

सारख्या कथा मुंबईत जगण्याच्या झटापटीत बळावलेल्या विकृतीतून निर्माण झालेले जीवनविषयक प्रश्न रंगवतात तर त्यांच्या "एक सुन्हेरा ख्वाब" या कथेत तुरुंगातील समग्र विश्व येते. पाध्ये यांच्या कथेत मुंबईतील या दुबळ्या पतीत माणसांबरोबरच झोपडपट्टीतील जीवन ही त्यांच्या कथेचे विषय होतात.

माणसाने निर्मिलेल्या विविध जाती-जमाती मुंबईत एकत्र नांदत असतात. त्यात कधी जात आडवी येत नाही. ती सुखादु:खामध्ये एकत्र-पणे एकमेकाची साथ निभावत असतात. पाध्ये या विश्वाचा वास्तव वेध त्यांच्या कथात घेतात.

त्यांच्या कथेत येणारी पात्रे विविध-जाती जमातीतील आहेत. आबा टुकरुळ, गोस्वामी, रहिमतखां, मैमुना, अब्दुल बाकर, नानीभाई, मनोरमा राशिनकर, नॅन्सी, शेली, बकुळा, केरु गाबत्या, सिताबीन, इब्रू, जॉन, कैकू दमाणी इ. व्यक्तींची फक्त नावे जरी पाहिली तरी आपल्या लक्षात येते की, ही माणसे विविध जातीची, जमातीची, धर्मांची आहेत. ती मुंबईच्या जीवनाशी एकरुप झालेली आहेत. पाध्ये यांच्या कथेत त्यांच्या जीवनाचा पट येतो. कोणी मुसलमान, पारशी, ख्रिश्चन आहे तर कोणी गुंजराथी, हिंदू, बंगाली आहे. पण सगळ्यांचे जगणे जात, धर्म गळून जाऊन माणूस म्हणून उरलेले आहे. ही मुंबईच्या गतिमान जीवन संघर्षाने केलेली किमया ही पाध्ये यांच्या नजरेतून सुटत नाही.

पाध्ये यांच्या कथांना कोणताच विषय वर्ज्य नाही. मुंबई महानगरीतील विविध जीवनस्तर, जाती, जमाती या सगळ्यांना ते कथाविषयात स्थान देतात. त्या त्या जीवनाचे ताण-तणाव कथेत जिवंत करतात.

मुळात पाध्ये यांचे अनुभवविश्व वैविध्यपूर्ण आणि संपन्न आहे. प्रत्येक अनुभवाच्या मुळाशी ते सहज पोहचतात. जीवन दर्शनाचा त्यांचा आवाकाही प्रचंड आहे.

माणसाच्या मनाचे विविध स्तर आणि त्यातील गुंतागुंत हे सर्वही पाध्ये यांच्या कथेत समग्रपणे चित्रित होते.
त्यामुळे पाध्ये यांच्या कथेचे समर्थ वैशिष्टय म्हणून त्यांच्या या जीवन चित्रणातील विविधतेचा उल्लेख महत्त्वपूर्ण आहे.

वास्तवता:

भाऊ पाध्ये वास्तवाचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण करतात. त्यांच्या साहित्यात त्यांनी चित्रित केलेले वास्तव हे ही त्यांच्या लेखनीचे वैशिष्टय मानावे लागते.

पाध्ये आपल्या साहित्याचे आशयद्रव्य वास्तवातून निवडतात. आशयद्रव्याची निवड वास्तवातून केल्यामुळे त्यांच्या साहित्याला कलात्मकता लाभते. पाध्ये यांना फक्त कल्पनेचे आभास निर्माण करुन शब्दबंबाळ कृती निर्माण करण्यात रस नाही. उलट वास्तवाच्या आधारे जीवनाच्या विविध समस्या ते वाचकांच्या समोर ठेवतात.

पाध्ये यांच्या साहित्याचा प्रदेश मुंबई ही महानगरी आहे. या महानगरीतील प्रत्येक विभागाची पुन्हा वेगवेगळी प्रदेश वैशिष्टये आहेत. या भागात वावरणा-या माणसांचेही वेगवेगळे स्तर आहेत. या सर्वांचा उपयोग वातावरणासाठी आपल्या कथेत करतात. त्या त्या गोष्टींची वास्तवता ते अत्यंत जीवन्तपणाने साकार करतात.

पाध्ये यांची मनोवृत्ती मुळी प्रत्येक गोष्टीचा ध्यास घेणारी, त्यांच्या मुळाशी पोहचणारी आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीतील, प्रदेशातील,

व्यक्ती-वर्तनातील तपशील त्यांच्या नजरेतून सुटत नाहीत. ते हे सर्व तपशील आपल्या लेखनात पेरतात. त्यामुळे त्यांनी रंगवलेले चित्र अधिक वास्तव होते.

पाध्ये यांच्या कथेत समग्र मुंबईचा प्रदेश तेथील सर्व बारकाव्यानिशी येतो. या महानगरीतील जीवनाची विविध क्षेत्रे, गुन्हेगार, कलावन्त, कामगार, झोपडपट्टी इ. सर्वांचे चित्रण ते आपल्या कथेत वास्तवतापूर्ण करतात.

मुंबईत नरीमन पॉईंट विभागातील उच्चभ्रूंचे जीवन "पासवर्ड"सारख्या त्यांच्या कथेत येते. तर "अनुभव", "साप", "बगीचा", "अक्करमाशा" सारख्या कथेत "चाळीतील विश्व येते. या-चाळीतील शेजरधर्म मत्सर द्वेष राग - लोभ या सहीत पाध्ये यांच्या कथेत चाळ येते. ते चाळ रंगवत असताना तेथील तपशील मोठया खुबीने कथेत पसरतात. त्यामुळे चाळीला जीवंतपणा येतो. "चाळ" वास्तव वाटू लागते.

चाळीतल्या जीवनाबरोबरच "वेश्या वस्तीतील जीवन" त्यांच्या "तेरी भी चूप मेरी भी चूप" सारख्या कथेत येते तर त्यांच्या "पोल्ट्रीफार्मिंग" कथेत मुंबईतील संपूर्ण विभागच्या विभागच ते जिवंत करतात. पाध्ये आपल्या कथेतून या विविध जीवन क्षेत्रांचा उपयोग करुन आपल्या कथा वास्तव करतात.

कलावन्त राजकीय गुंड - तुरुंग या साऱ्याचे चित्र ही ते तपशीलांसहीत जीवंत करतात. त्यांच्या "एक सुन्हेरा ख्वाब", "स्व. देशभक्त काका", "देश पुढे गेला" या कथा याची साक्ष देतात.

भाष्य करत नाहीत:
=============

पाध्ये आपल्या कथातून कोणताही प्रसंग जसा तटस्थतेने चित्रित करतात. तसेच ते कोठे ही आपला अभिप्राय देत नाहीत. म्हणजेच ते कथानकातील संघर्षात पक्षकार होत नाहीत. वर्णनात लेखकाच्या मताला डोकावू देत नाहीत. जी भूमिका मांडावयाची असेल ती पात्रांच्या साहयाने मांडतात.
कथेत व पर्यायाने त्यांच्या सर्वच लेखनात ते त्यांच्यातल्या "लेखकाला" लुडबुडू देत नाहीत. एखादया घटनेवर, प्रसंगावर शेरेबाजी करत नाहीत. तसेच संपूर्ण कथालेखनात कधीही पात्रांच्या विचाराचा अथवा वर्तनाचा पक्षकार म्हणून भूमिका बजावत नाहीत. चांगले काय आणि वाईट काय हे ठरवण्याच्या फंदात ते पडत नाहीत. तसेच लेखनात स्वत: गुंतत नाहीत. इतकी अलिप्तता ते कथा लेखातात बाळगतात. त्यामुळे प्रत्येक कृती ही त्या पात्रांची आणि त्या घटनांची अशी वाटते.
त्यांची "कुटुंब" कथा याचे चांगले उदाहरण आहे. या कथेतील निवेदक - मी -कुटुंबसंस्थेबद्दलची चीड आपल्या कुटुंबातील वातावरण, मुलींने केलेला घोटाळा या सगळ्याचे वर्णन करतो. त्यातून त्याची रूढ नैतिकतेला छेद देणारी मते येतात. ही मतं आणखी गडद करण्यासाठी लेखकाला अभिप्राय देता आले असते. पण पाध्ये देत नाहीत. त्यामुळे त्यांची कथा मनाला भिडते.

त्यांची "बेबी" कथा ही यादृष्टीने महत्त्वाची आहे. बेबी मुलांना नापसंत करत असते. असाच एक मुलगा बेबीने नापसंत केल्यानंतरचे वर्णन - "दोन दिवसांचा पुण्याचा मुक्काम करून तात्या, बेबी परतले. बेबीला काही स्थळ पसंत पडले नाही. पणबेबीला स्थळ पसंत न पडण्याचे कारण म्हणजे साक्षात हैड्रोजन बॉंब होता. मुलगा म्हणे आर.एस.एस.च्या शाखेत जात होता. आणि तिला आर.एस.एस. मुळीच पसंत नव्हते."[१४]

या वर्णनानंतर त्यांची दिलखुलास अभिप्रायांची चलती चालू शकली असती पण पाध्ये तो प्रसंग तेथेच संपवतात. त्यामुळे तो वाचकाच्या मनाला अधिक भिडतो.

पाध्ये यांच्या लेखनात ते अभिप्राय न देण्याने कलात्मकता तर येतेच पण त्याबरोबर वास्तव ही अनलंकृतपणे वाचकासमोर येते.

केवळी जीवन दृष्टी:
==============

पाध्ये यांच्या सर्वच लेखनातून त्यांची जीवनाकडे पहाण्याची स्वतंत्र अशी एक दृष्टी आहे असे आपल्याला प्रकर्षाने जाणवते. ही त्याची जीवन-दृष्टी स्वच्छ, निर्मळ आणि कोणतेच पूर्वग्रह न ठेवणारी असल्याचे आपल्या प्रत्ययाला येते.

१) पाध्ये हे मुळात समाजवादी विचारात वाढल्यामुळे व त्यांचे व्यक्तित्व त्यास अनुरूप बनत गेल्यामुळेते संपूर्ण जीवनाकडे मानवतावादी दृष्टीने पहातात. या त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोणामुळे ते विविध जीवनस्त-रांमध्ये मिसळू शकतात. तेथील अनुभव ग्रहण करू शकतात. या अनुभवाच्या जोरावर ते मानवतावादी साहित्याची निर्मिती करतात.

या मानवतावादी दृष्टीमुळेच त्यांच्यात प्रत्येक जीवन विश्वाकडे तळमळीने , आत्मीयतेने पहाण्याची वृत्ती निर्माण झालेली दिसते. त्यामुळे ते कोणतीही समस्या लेखनात मांडत असताना अत्यंत तळमळीने मांडण्याचा प्रयत्न करतात. पण या आत्मीयतेच्या आहारी जात नाहीत. तेथे ही लेखन योग्य तटस्थता त्यांच्या लेखनात दिसते.

"त्यांच्या "नवरा", "अक्करमाशा", "पडदा", "ठेच", या कथेत नव-यातील कमतरतेमुळे स्त्रीला सुख मिळत नसेल तर तिचा कोंडमारा होतो. हे दाखवत असताना त्या स्त्रियांची जीवनविश्वे तळमळीने, आत्मीयतेने वाचकासमोर ठेवतात पण पक्षकार होत नाहीत.

२) लैंगिकतेकडे पहाण्याची त्यांची म्हणून स्वतंत्र अशी एक दृष्टी आहे. ते लैंगिकतेकडे निसर्गधर्म म्हणून पहातात. भूक ही माणसाची गरज आहे. तशीच लैंगिक भूक असे ते मानतात. त्यामुळे निसर्गधर्माने ते स्त्री-पुरुष संबंधाकडे पहातात. त्यात त्यांना रूढ नैतिकता तकलादू वाटते. स्त्री अथवा पुरुषाने निसर्गक्रमानुसार आपली लैंगिक भूक भागवण्याचे प्रयत्न केले तर त्यात अनैतिकता आहे असे त्यांना वाटत नाही.
नपुसक नवरा असल्याने एखादया स्त्रीने परपुरुषाशी संबंध स्वेच्छेने ठेवला तर त्यांना त्यात गहजब माजवण्यासारखी अनैतिकता वाटत नाही (उदा. नवरा, पडदा)

समाजाची सर्वच नैतिकता ही लैंगिकतेवर आधारलेली असते. पण पाध्ये येथे सच्चेपणाने, अंत:प्रेरणेने जगण्याला महत्त्व देतात व व्यक्तीची नैतिकता महत्त्वाची मानतात. (उदा. वसुंधरा, थिएटर)

लैंगिकतेचे वर्णन ही ते निर्लेप पध्दतीने करतात. वाचकांच्या भावना चाळवण्यासाठी ते वर्णन करत नाहीत. वर्णनात स्वत:ची समरसता दाखवत नाहीत. उदा. "आता आपण झोपून ट्राय केला पाहिजे. त्याने पदीला ओढली. पदी पलंगावर येता येता त्याच्या ह्या गडबडीला वैतागली.... ती कमालीची बोअर झाली.... त्याच्या ट्रायमुळं तिची सगळी बॉडी घुसळत होती."[१५]
हे संपूर्ण वर्णन पाहिल्यानंतर पाध्ये एक घटना एवढेच महत्त्व देऊन या प्रसंगाकडे पहातात. त्यामुळे लैंगिकतेकडे पहाण्याची त्यांची ही स्वतंत्र दृष्टी ही त्यांच्या लेखनाला वेगळेच परिमाण प्राप्त करून देते.

३) स्त्री-पुरुष संबंधाकडे पहाण्याची त्यांची जशी वेगळी निर्लेप दृष्टी आहे तशीच "स्त्री-विश्वाकडे" ते स्वतंत्र दृष्टीने पहातात.

स्त्रीचे वस्तू मूल्य त्यांना मान्य नाही. स्त्रीला व्यक्ती म्हणून स्थान आहे. तिचे एक स्वतंत्र अस्तित्व आहे. यादृष्टीने स्त्रीव्यक्तिरेखा आपल्या कथातून रेखाटतात.

त्यांची प्रत्येक कथा ही स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे वास्तव वर्णन करणारी कथा आहे. त्यांना त्या जीवनातील विविध रूढ संकेतांचाही तिटकारा आहे. त्यामुळे त्या जीवनातील विविध तपशील ते आपल्या कथातून चित्रित करतात. अन्य मराठी लेखक-लेखिकांपेक्षा हा त्यांचा दृष्टिकोण स्वतंत्र व वेगळा आहे.

४) पाध्ये देश, देशाचे राजकारण, संघटना, पक्ष, देशाची अर्थ-व्यवस्था याच्याकडेही स्वतंत्र दृष्टीने पहातात. समाजवादी विचाराचे पाध्ये कधी कधी उपहासातून आपल्या समाजव्यवस्थेची अध:स्थिती चित्रित करतात. "देश पुढे गेला" या कथेत देशातील "चलनवाढी"चे त्यांनी केलेले विश्लेषण हे तर वाचकाला थक्क करून सोडणारे आहेत.

५) पाध्ये आपल्या अनुभवाकडे, लेखनाकडे "गंभीरता"पूर्वक पहातात. ही गंभीरता विरळ स्वभावातच आढळते. त्यांना कोणताही अनुभव तपशीलासह, वास्तवपूर्ण असा मांडावा वाटतो. कारण त्या अनुभवातून उभी रहाणारी कथा त्यांना बाजारू करायची नसते. त्यामुळे त्यांची ही "गंभीरता" ही एक वेगळी वैशिष्टपूर्ण दृष्टी मानावयास हवी.

सारांश:

पाध्ये यांच्याकडे प्रत्येक गोष्टीकडे पहाण्याची स्वतंत्र, मर्मग्राही दृष्टी आहे. जिच्या आधारे ते विशात्मक अनुभव साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न करतात.

भाषाशैली:

भाऊ पाध्ये यांच्या साहित्यात स्वतंत्रता, तटस्थता, वास्तवता ही जशी मूल्यस धारण करणारी ठिकाणं आहेत तशीच त्यांची भाषा हे ही एक त्यांच्या साहित्याचं वेगळं वैशिष्टय आहे.

पाध्ये यांच्या लेखनातील भाषा ही साधी सरळ आणि "कुठेही दांडी न मारता" मनाला भिडणारी अशी असते. त्यांना कोणत्याही कलाकृतीसाठी किंवा वाङ्मयप्रकारासाठी भाषा कमवावी, घडवावी किंवा निवडावी लागत नाही.

आशयद्रव्याबरोबरच त्यांची भाषा अपरिहार्यपणे अवतरते आणि कलाकृती उभी करते. त्यासाठी त्यांना भाषा वापराचे कष्टमय प्रयत्न करावे लागत नाहीत. त्यांच्या कथा वाचल्यानंतर त्यांच्या भाषाशैलीचे नवनवे विशेष दिसून येतात.

१) अनुत्कटता:

पाध्ये यांच्या लेखनशैली संदर्भात योग्य शब्द वापरायचाच झाला तर त्यांची शैली अनुत्कटशैली आहे असेच म्हणणे योग्य होईल.
पाध्ये कोणताही अनुभव चित्रित करत असताना त्या अनुभवाशी लेखकाची समरसता दाखवत नाहीत. त्यामुळे ते सगळे वर्णन तटस्थपणे करतात. पण ही वास्तवता त्यांच्या अनुत्कट शैलीमुळे अधिक गडद होते.

ते वर्णनात भावविवश होत नाहीत किंवा आपल्या लेखनात उत्कट शैलीचावापर करत नाहीत. कोणताही प्रसंग वर्णन करत असताना ते त्यामध्ये त्यांच्यातील लेखकाला डोकावू देत नाहीत. त्यामुळे लेखनाला

सहजता येते. कधी कधी ते उपहासाचा वापर करतात. उपहासाने शैली अनुत्कट व्हायला मदत होते. पक्षकाराची भूमिका त्यांची लेखानी कधीच घेत नसल्यामुळे वर्ण्य विषय फक्त "घडले हे असे" इतक्या सहजतेने ते रंगवतात. त्यातून वाचकाच्या मनाला तो प्रसंग भिडतो व त्यांची अनुत्कट शैली परिणाम साधून जाते.

अनलंकृतता:
=======

पाध्ये आपल्या गद्य लेखनासाठी साधी, सरळ व सोपी भाषा वापरतात. त्यांचे निवेदन प्रसंगयोग्य साध्या भाषेत असल्यामुळे मनाला भिडते. त्यांच्या भाषेत काव्यात्मकतेचा मागमूस ही नसतो. उदा. "तिने खिडकी उघडली. ती समोरची खिडकी बंद होती. ती थोडी पुढे वाकली तेव्हा खालची रहदारी दिसू लागली – जिना दिसला. जिन्याने एक काळेकपडेवाला वर येऊ लागला. तिला वाटलं, हा वेश्येकडे आला – जिन्याचे वरचे लोक गॅलरीतून दिसायचे. ती धावत धावत बाहेर गेली. दरवाजा उघडून गॅलरित उभी राहिली. तो आसामी वर आला. "चलो ना" वालीकडं वळला नाही. तो उलट मागच्या बाजूला गेला. तिथे एक म्हातारा गृहस्थ बाहेरच एका लाकडी पेटीवर बिडी पेटवून खोकत बसला होता. त्याच्याकडे प्रुफांचे भेंडोळे दिले आणि त्याने दिलेले भेंडोळे घेऊन परत फिरला आणि आल्या वाटेने निघून गेला.

"कुणी येत नाही – आता ....."[१६]

हे साधे सरळ आणि सोपे निवेदन वाचल्यानंतर आपल्यासमोर तिची अधिरता, उत्सुकता, तिथली एकूण स्थिती, वातावरण व्यक्ती नजरेसमोर उभी रहातात या वर्णनाने हा प्रसंगही मनाला भिडतो.

कारण यात काव्यात्मकता, उपमा, अलंकार, प्रतिके-प्रतिमा असला फालतूपणा नाही. त्यामुळे ही भाषा अधिक जिवन्त आणि प्रत्ययकारी

वाटते. त्यामुळे पाध्ये यांच्या कथेचे हे महत्त्वाचे वैशिष्टय आहे .

चित्रमयता:

पाध्ये कथेतील कोणताही प्रसंग आपल्या चित्रमय शैलीने वाचकासमोर जिवन्त करतात. मुद्दाम म्हणून कष्टपूर्वक पाध्ये हे चित्रमय वर्णन करत नाहीत. सहजपणे ते त्यांच्या कथा निवेदनाच्या ओघात येऊन जाते. पाध्ये यांचा प्रसंग जिवन्त करण्याची हातोटी वेगळी व स्वतंत्र आहे. ते एखादा भूप्रदेश, एखादी वसाहत, एखादी चाळ सहजपणे वाचकांच्या डोळयासमोर साध्या शब्दांच्या माध्यमातून उभी करतात.
उदा. "रतिलाला मॅन्शन" प्रत्येक मजला बोळासारखा खोल. सहा खोल्या उजव्या हाताला, पाच डाव्या हाताला. खोलीबाहेर दोन-दोन, तीन-तीन छोक-या. तुम्हाला छेडत न्याहाळत बसलेल्या... एखादी दारात. डाव्या हाताच्या शेवटच्या खोलीत एक गोरी, गोल तोंडाची, नाजुक जिव्हणीची सडपातळ मुलगी. तिने मला डोळा घातला."[१७]

कोठेही भडकपणा न आणता पाध्ये या वर्णनातून आपल्यासमोर प्रसंग जीवन्त करतात. हेच त्यांच्या भाषेचे सामर्थ्य आहे.

पाध्ये आपली भाषा अनलंकृतपणे, अनुत्कटपणे वापरून ही व्यक्ती-व्यक्तीमधील तणाव चित्रमय स्वरूपात वाचकांसमोर ठेवतात. उदा. "पण ती समंजस आहे. सकाळी चहा देते. कधीतरी पोहे वगैरे, नंतर वेळेवर जेवण, नंतर मी ऑफिसमध्ये गेलो की काय करते ठाऊकनाही. पण शेजा-या पाजा-यात उठणं-बसणं नाही. मी तशीच सूचना दिलेली असते.... कामावरून आलो की पुन्हा पोहे-चहा वगैरे. कसे झालेत वगैरे सवाल नाही..... भूक असेल तर खा. नाहीतर रात्री जेवन.... अखेर आमच्या अलिखित कराराचे शेवटचे कलम म्हणजे तिने आणि मी वेगळे

निजायचे.... माझ्याकडे पाठ करून झोपलेली असते."[१८]
या प्रसंगातून पाध्ये भाषेच्या सामर्थ्यावर चित्र उभे करतातच पण साध्या सरळ निवेदनातून ते जबरदस्त तणाव ही उभा करतात. ही दुर्मिळ शैली पाध्ये यांना अवगत झालेली आहे.

## बोलीचा वापर:

पाध्ये आपल्या सर्व कथांच्यामधून मुंबई या महानगरीतील बोलीचा वापर विशेष गांभीर्याने करतात. मुंबईची बोली ही मुळात वैशिष्टयपूर्ण आणि तिथल्या संस्कृतीत मुरलेली बोली आहे. पाध्ये आपल्या लेखनातून या बोलीचा जाणीवपूर्वक वापर करतात. कारण या बोलीच्या वापरातून वर्ण्य विषयाला अधिक वास्तवता प्राप्त होते. त्यामुळे त्यांच्या कथांतून बोलीचा अत्यंत चांगला उपयोग त्यांनी करून घेतल्याचे आपल्याला जाणवते. बोली हे त्यांच्या लेखनशैलीचे एक वैशिष्टयच आहे. कारण पाध्ये नेहमी आम पब्लिकच्या भाषेतून लिहितात. "इतकी मुरगी त्याने एवढयात चापली होती की त्याचं पोट आता रबरी फुग्यासारखं टरटरीत झालं होतं."[१९]
"मी दिला रामपुरी बोरसेच्या पोटात सारून"[२०]
"साला, उदया मला जॉब कार्डवर साहेबांची सही घ्यायची होती नाहीतर प्रॉडक्शन - बोनसच्या टायमाला बोंबाबोंब व्हायची"[२१] ही उदाहरणादाखल घेतलेली वाक्ये जरी बघीतली तरी पाध्ये मुंबईच्या बोलीचा किती जीवन्त वापर करतात हे लक्षात येईल. व्यक्ती - चित्रणासाठी ते ही खास बोली वापरतात.

चाळ, वस्ती, उद्योग-धंदा, कामगार या सा-यांच्या वेगवेगळया वैशिष्टयपूर्ण बोलींचा वापर ते आपल्या लेखनात करतात. त्यामुळे त्यांचे लेखन अधिक वास्तव होते.

LIBRARY

सहजता:
=====

पाध्ये त्यांच्या गद्यलेखनात त्यांची अशी साधी नैसर्गिक भाषा वापरतात. त्यांना भाषेवर प्रयोग करण्याची गरज भासत नाही. तिची मोडतोड ही करावी लागत नाही. अनुभवानुरूप भाषेचा धर आपोआप त्यांच्या लेखनीतून आकाराला येतो.
सामान्य माणसे ज्या सहजतेने भाषा वापरतात त्याच नैसर्गिक भाषेत ते लिहितात. त्यामुळे त्या भाषेला ही कलात्मक मूल्य प्राप्त होते.

पाध्ये यांच्या कथांच्या मर्यादा:
=======================

पाध्ये यांच्या लेखनात अनेक वैशिष्टये आहेत ही बाब त्यांच्या कथा-लेखनाबाबतचे त्याचे यश दाखवणारी आहे. पण पाध्येंनी काही कथा अत्यंत बेफिकीरपणाने लिहिलेल्या आहेत.
"सत्यानाश" सारखी कथा मंदा आणि सत्याच्या प्रयत्नपूर्वक केलेल्या प्रेमविवाहाची कथा आहे. याकथेत पाध्येंना मुंबईतील विवाह संस्कृतीचे पैलू दाखवायचे असावेत. पण पाध्ये या कथेचे लेखन इतके ठिसूळ करतात की ती कथा आपले कथापण हरवून बसते.

"बेबी" सारखी चांगला आशय असणारी कथा फक्त कथेबाबतचे भान न पाळल्यामुळे पसरट होत जाते. ती इतकीपसरट होते की वाचकाला त्या कथेबाबत कोणतीच आत्मीयता उरत नाही. त्यामुळे चांगले आशयद्रव्य फक्त पाध्येंच्या बेफिकीरपणामुळे बाजूस पडते.

पाध्ये कथेच्या मांडणीबाबतही ब-याच वेळा योग्य ती दक्षता घेत नाही. कथा रेखीव स्वरूपात वाचकासमोर यावी यासाठी पाध्ये फारसे परिश्रम घेतातच असे दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या "ओळख" या कथेतील आशयद्रव्य वेगळे आणि सामर्थ्यवान आहे. पण नीट मांडणी नसल्यामुळे

ते आशयद्रव्य बाजूस पडते. तर "घुम्या" कथेची मांडणी पाध्ये यांनी ज्या गांभीर्याने करावयास हवी होती त्या गांभीर्याने न केल्यामुळे कथा आपला आकारच हरवून जाते.

पाध्ये यांच्या काही कथा त्यांच्या "फिल्मी शैलीने बिघाडवलेल्या आहेत. "आऊट हाऊस" कथा आशयद्रव्याच्या दृष्टीने चांगली आहे. पण कथा वाचकांच्यासमोर येत असताना फिल्मी योगायोग घेऊन येते. त्यामुळे कथा एखादया चित्रपटासारखी योगायोगांची कथा होते व त्या कथेची वाचनीयता हरवते. हीच गोष्ट आपल्याला " रखडलेली" या कथेबाबत झालेली दिसते. या कथेतील निवेदनात निवेदकाची पत्नी मेलेली दाखवणे गरजेचे आहे असे वाटल्यावर मध्येच पत्नी मरण पावते व नायक मैदाला मागणी घालतो. यामुळे कथा कृत्रिम बनते.

कथेचा शेवट करण्याबाबत ही पाध्ये कधी कधी फारसी अस्था दाखवत नाहीत. त्यामुळेही त्यांची कथा फसलेली आढळते. एकीकडे पाध्ये फक्त शेवटच्या एखादया वाक्यावर संपूर्ण कथेची कलात्मक यशस्वीता निर्माण करतात. याचे उत्तम उदाहरण "चलो ना वाली" ही कथा होऊ शकेल. तर दुसरीकडे जमत आलेली कथा कुठे संपवावी हे न लक्षात घेतल्याने फसलेली दिसते. 'डॉक्टर कुमारी' ही कथा संपवताना लेखक शेवटाचा विचार न करताच सोडून देतात. हीच अवस्था त्यांच्या "थोडी सी जो पीली" या कथेबाबत झालेली आहे.

पाध्ये "वेड" सारखी दमदार आशयद्रव्य असलेली कथा अकारण कृत्रिम करतात. एक शिक्षिका, तिचे विद्यार्थी, प्रत्येकाला तिचा एक एक अवयव आवडतो. घरात संधी साधून सगळेच तुटून पडतात. यातून पाध्येंना मानवी मनातील हिंसा आणि तिचे वेगळेपण दाखवायचे आहे. पण कथा कृत्रिम झाल्याने बटबटीत होते. कथेतील आशयद्रव्याला

न्याय मिळत नाही.

सारांश:

पाध्ये जरी गंभीरतेने कथालेखन करत असले, त्यांच्या कथा मराठी कथेच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या असल्या तरी त्यांच्या कथालेखनात काही दोष आहेत. हे नमूद करावेसे वाटते.

सारांश:

मुळातच मराठी साहित्यात स्वत:ची लेखनविषयक भूमिका असणारे लेखक विरळ आहेत. त्यामुळे लेखनभूमिकेशी प्रामाणिक राहून लेखन करणाऱ्या लेखकांची संख्या अत्यल्प स्वरूपाचीच आहे.
कथेबाबत विचार केला तर गंगाधर गाडगीळ, कमल देसाई आणि भाऊ पाध्ये ही नावे आपल्यासमोर येतात.

पाध्ये यांच्या कथालेखनातून व्यापक सहानुभाव असणारी मानवतादृष्टी प्रत्ययाला येते. ही मानवतावादी दृष्टी मराठी कथाकारांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची वाटते. कारण एवढा व्यापक सहानुभाव असणारा मानवतावादी कथाकार सापडणे कठीण. त्यांच्या कथेतील पात्रे सच्चेपणाने, बाह्य प्रतिष्ठेची तमा न बाळगता, सहजपणे जगताना दिसतात. अकृत्रिम, नैसर्गिक जगणे त्यांना आवडते. यातून पाध्येंची व्यापक जीवनदृष्टी प्रत्ययाला येते. भालचंद्र नेमाडेंचा शब्द वापरायचाच झाला तर त्यांचे लेखन "नवनैतिकतावादी" भूमिकेचे ठरते. कारण या भूमिकेचे सर्व पैलू पाध्येंच्या कथांतून सापडतात.

पाध्ये आपल्या कथालेखनासाठी मुंबई शहरातील वेगवेगळी जीवनक्षेत्रे निवडतात. इतर मराठी कथेसारखी त्यांची कथा एकाच अनुभव विश्वात

रममान होत नाही. कधी ती कामगार चळवळीची कथा असते. (एक सुन्हेरा ख्वाब) तर कधी चाळीतील विश्वाचे दर्शन घडवते. (पायातला बूट, साप, अनुभव) वेश्यावस्ती, उच्चभ्रू लोकांचे जीवन, साध्या कारकूनाचे जीवन. अशी वेगवेगळी जीवनक्षेत्रे त्यांच्या कथेचे विषय होतात. "स्व. देशभक्तकाका" सारखी कथा मुंबईतील राजकीय जीवनाचाही वेध घेते. तर "देश पुढे गेला" सारखी कथा "चलनवाढ" हा आर्थिक विषय घेऊन वाचकाला थक्क करते. भाऊ पाध्ये जीवनाकडे अत्यंत आस्थेने आणि प्रमाणिकपणे पहातात. त्यामुळेच त्यांच्या कथेत एवढी विशाल जीवनक्षेत्रे ते सामावून घेऊ शकतात.

पाध्ये कोणत्याही कथेत लेखक म्हणून लुडबुड करत नाहीत. वर्ण्याशी समरस होत नाहीत. कथेतील पात्रांचा पक्ष घेत नाहीत. अगदी निर्लेपतेने वर्णन करतात. त्यामुळे त्यांच्या अलिप्ततेला प्रगल्भ वाङ्‌मयीन मूल्य प्राप्त होते. मराठी कथेच्या इतिहासात अशी अलिप्तता दुर्मिळ आहे. म्हणून पाध्येंची कथा अधिक लक्षणीय वाटते.

"वास्तवता" हा पाध्यांच्या लेखनाचा आत्मा आहे. ते आशयद्रव्य वास्तवातून निवडतात. हे वास्तवआशयद्रव्य अत्यंत स्वच्छ व तटस्थपणे वाचकासमोर ठेवतात. लैंगिक व्यवहाराकडे ते कमालीच्या निर्मळपणे पहातात. त्यामुळे त्यांच्या कथालेखनाला वेगळेच परिमाण प्राप्त होते. पाध्यांच्या आधीच्या कथेत कुठेच लैंगिक व्यवहाराकडे निर्लेपपणे व नैसर्गिक व्यवहार म्हणून पाहिलेले दिसत नाही. त्यामुळे पाध्यांचे यश अधिक गडद होते.

पाध्यांच्या वैशिष्टयपूर्ण शैलीसाठी "अनुत्कट शैली" हा एकमेव शब्द वापरता येईल. त्यांची भाषा अनलंकृत, चित्रमय, व नैसर्गिक सहज अशी आहे. त्यामुळे वर्ण्य विषय वाचकाला सहज भिडतो.

मुंबईच्या बोलीचा वापर ही ते कलात्मकपध्दतीने करतात. बोलीच्या वापरांमुळे त्यांनी वर्णन केलेले तपशील अधिक गडद होतात. त्यांची भाषा हे ही त्यांच्या कथेचे बलस्थल ठरते.

पाध्ये यांच्या लेखनाची अशी विविध वैशिष्टये त्यांच्या कथातून दिसून येतात. त्याबरोबरच त्यांच्या काही कथा ह्या पसरट आणि निष्काळजीपणे संपवलेल्याही दिसतात. त्यांची "बेबी" सारखी कथा पसरट होते. त्यामुळे ती वाचनीयता गमावते. तर "डोळेमिशा"सारखी कथा ते फक्त निष्काळजी-पणे लिहित गेल्यामुळे कंटाळवाणी व कृत्रिम होते.

......

प्रकरण चौथे

संदर्भ

१) पाध्ये भाऊ : "वसुंधारा" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ८४.

२) पाध्ये भाऊ : "अक्करमाशा" एक सुन्हेरा ख्वॉब", धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९८०, पृ. ९९.

३) पाध्ये भाऊ : "सांड" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१ पृ. ६६.

४) पाध्ये भाऊ : "कुटुंब" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई आवृत्ती पहिली, १९८४, पृ. १८.

५) पाध्ये भाऊ : "एक सुन्हेरा ख्वॉब" एक सुन्हेरा ख्वाब, धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९८०, पृ. २४.

६) पाध्ये भाऊ : "ठेच" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. १६४.

७) पाध्ये भाऊ : "कुटुंब" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. २७.

८) पाध्ये भाऊ : "संकेत मिलनाचा" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ३५.

९) पाध्ये भाऊ : "वसुंधारा", मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ८१.

१०) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ८५.

११) पाध्ये भाऊ : "थालीपीठ", थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. १९८.

१२) चित्रे दि.पु. : "भाऊचे अस्तित्वभान" गुलमोहर दिवाळी अंक, पुणे, १९८९.

१३) पाध्ये भाऊ : "मुरगी" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली १९८१, पृ. २५.

१४) पाध्ये भाऊ : "बेबी" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. ६३.

१५) पाध्ये भाऊ : "मुरगी", मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई आवृत्ती पहिली, १९८१, पृ. २६.

१६) पाध्ये भाऊ : "क्लोना वाली" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८४, पृ. ३८.

१७) पाध्ये भाऊ : "तेरी भी चूप मेरी भी चूप" थोडी सी जो पीली, सरस प्रकाशन, माणिकपूर, आवृत्ती पहिली, १९८६, पृ. १५७.

१८) पाध्ये भाऊ : "संकेत मिलनाचा" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली १९८१, पृ. ३२-३३.

१९) पाध्ये भाऊ : "मुरगी" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ६.

२०) पाध्ये भाऊ :"एक सुन्हेरा ख्वाब", एक सुन्हेरा ख्वाब, धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९८०, पृ. ६.

२१) पाध्ये भाऊ : "अक्करमाशा" एक सुन्हेरा ख्वाब, धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९८०, पृ. १००.

........